

# हे दास्य संपलेच पाहिजे

प्रा. सौदामिनी राव

'मातृदेवो भव' यासारखी स्त्रीच्या मातृत्वाचा गौरव करणारी सुभाषिते स्त्रीच्या आजच्या वास्तव्य परिस्थितीशी अगदीच विसंगत आहेत. मनुष्य टोळया करून रहात असतानाच स्त्रीने शेतीचा शोध लावला. झाडे कशी उगवतात, मुले कशी होतात ह्याचे ज्ञान त्यावेळेस मनुष्याला झालेले नव्हते. म्हणून जमिनीतून धान्य पिकवणाऱ्या आणि मुलांना जन्म देऊन मानवाचे पुनरुत्पादन करणाऱ्या स्त्रीमध्ये अतिमानवी, दैवी शक्ती असली पाहिजे असे त्या-वेळच्या समाजाला वाटले. समाजाने स्त्रीला देवीपण अर्पण केले. गौरीसारख्या स्त्री देवतांचा उगम त्या काळात झाला. स्त्रीला समाजात महत्वाचे स्थान प्राप्त झाले. एवढेच नव्हे तर काही काळ मातृसत्ताक पद्धतीही अस्तित्वात राहिली. परंतु शेतीअवस्थेत उत्क्रान्तीच्या विशिष्ट टप्प्यावर जेव्हा खाजगी संपत्तीचा उदय झाला तेव्हा आपल्या संपत्तीला वारस आपल्याच रक्ताचा असला पाहिजे या पुरुषाच्या आग्रहामुळे बाकीच्या पुरुषाशी संबंध ठेवायला त्याच्या स्त्रीला मज्जाव करण्यात आला. स्त्री त्याची रहावी म्हणून चार भिंतींनी बंदिस्त घरात तिला डांबण्यात आले. शेताला जसे कुंपण घालावे तसे घराच्या भिंतींचे तिच्याभोवती कुंपण घालण्यात आले. तिच्यावर अनेक नीतीनियम लादण्यात आले, बंधने घालण्यात आली. एकेकाळी दैवीशक्ती समजण्यात आलेले मातृत्व आता तिच्या पायातील बेडी ठरले. स्त्रीच्या गुलामगिरीला कारण झाले. स्त्री ही पुरुषाची मालमत्ता समजली जाऊ लागली. तिचे संरक्षण करण्याची जबाबदारी तिच्याशी संबंधित पुरुषांवर समाजाने टाकली. तिचे सामाजिक संरक्षण नाहीसे झाले. 'विश्वचि माझे घर' अशी शिकवण देणाऱ्या आमच्या संस्कृतीने 'चूल आणि मूल' हेच स्त्रीचे कार्यक्षेत्र ठरवून 'घरचि माझे विश्व' असे स्त्रीला मानावयाला भाग पाडले. स्त्रीला शूद्र लेखून शिक्षणाचा, संपत्तीचा अधिकार नाकारला. सामाजिक व्यवहारातून तिला बाद केले.

## खुरटलेले व्यक्तीमत्व

शतकानुशतके आमच्या धर्माधिष्ठित समाजव्यवस्थेने स्त्रीला घरातील संकुचित जगात अडकवून ठेवले होते. अपुऱ्या माती, पाणी, सूर्यप्रकाशामुळे घरातल्या कुंडीतील झाडाची वाढ खुंटते तशी स्त्रीची स्थिती झाली. तिचे व्यक्तीमत्व खुरटलेले बनले. 'स्त्री ही निसर्गतःच अबला आहे, पुरुषाच्या संरक्षणाखालीच ती जगू शकते, म्हणून चूल आणि मूल हेच तिला योग्य क्षेत्र आहे' हे तत्वज्ञान म्हणजे स्त्रीच्या गुलामगिरीचे समर्थन करण्यासाठी रचलेले एक थोतांड आहे. स्त्री आणि

पुरुष यांच्यामध्ये लिंगभेद करणारा फक्त जीवशास्त्रीय भेद आहे. बाकी त्यांचे गुणावगुण, बुद्धी, भावना स्वभाव, कार्यक्षमता वगैरेमध्ये काही अंगभूत भेद नाही हे शास्त्राने सिद्ध केले आहे. स्त्रियांना योग्य संधी मिळाल्यास त्या पुरुषांच्याबरोबरीने सर्व क्षेत्रात कर्तृत्व गाजवतात हे चीन, रशिया व्हिएतनाम, जर्मनी वगैरे देशातील उदाहरणांवरून दिसून येते.

भारतात आज स्त्रिया शिकलेल्या आहेत, अर्थार्जन करू लागल्या आहेत. घटनेने त्यांना समान हक्क दिले आहेत तरी सर्वसामान्य स्त्रीची परिस्थिती फारशी बदललेली नाही ती परावलंबी, कमी कार्यक्षम संकुचित वृत्तीची, दैववादी, अंधश्रद्धाळूच आहे. स्त्रीचे घरातील व समाजातील स्थान गौणच आहे. स्त्रीकडे भोगवस्तू, पुरुषाची मालमत्ता म्हणूनच पाहिले जाते. घरातील संरक्षित जगात तिला ठेवण्याचा प्रयत्न केला जातो. जन्मापासून मुलगामुलगी भेद केला जातो. मुलांना आणि मुलींना दिले जाणारे शिक्षण, त्यांचे खेळ, त्यांच्यावरील संस्कार, त्यांच्या वागणकीसंबंधीचे नियम व अपेक्षा, नीतीनियम, लग्नविधीतील आणि वैवाहिक जीवनातील त्यांचे स्थान वगैरे सर्वच बाबतीत पुरुष श्रेष्ठ आणि स्त्री कनिष्ठ समजली जाते. सैपाकपाणी व इतर घरकाम, बालसंगोपन, पतीसेवा व पतीचे मन रमवणे, कुटुंबाचे कल्याण हेच तिचे प्राथमिक कर्तव्य समजले जाते. अर्थार्जन, समाजकार्य करावयाचे झाले तरी हे प्राथमिक कर्तव्य संभाळूनच तिने ते केले पाहिजे. 'आपण स्त्री आहोत आणि लग्न करून आपल्या पतीला, मुलांना, कुटुंबाला सुखात ठेवणे ह्यातच आपल्या जीवनाचे सार्थक आहे' हा संस्कार मुलीवर लहानपणापासूनच बिंबवला जातो. आणि हरतालिका, वटसावित्री, मंगळागौरी वगैरे व्रतवैकल्यांच्या सहाय्याने तो अधिकच पक्का केला जातो. हे काम तिने मनोभावे करावे म्हणून मातृत्वाचे देव्हारे माजवले जातात. स्त्रीमध्ये कल्पिलेल्या पतिव्रत्य, प्रेमळपणा, सेवापरायणता, त्यागीवृत्ती, मुग्धपणा, सोशिकपणा वगैरे गुणांचा सतत गौरव केला जातो.

## स्त्री केवळ जननी ?

साहित्य–नाटक–चित्रपटातून तसेच आदर्श स्त्रिया पुढे पुन्हा पुन्हा ठेवले जातात. 'स्त्री ही क्षणाची पत्नी व अनंतकाळची माता आहे' हे तिच्या मातृत्वाचा गौरव करताना स्त्री ही माणूस आहे, तिला स्वतःचे विचार, भावना, इच्छा, आशा, आकांक्षा आहेत या सत्यस्थितीकडे सोयिस्कररित्या दुर्लक्ष केले जाते. ती कोणाची कन्या, पत्नी, माता, भगिनी असाच तिचा विचार केला जातो. पुरुषसापेक्ष पतीसापेक्ष कुटुंबसापेक्ष जीवन जगायला तिला शिकवले जाते, भाग पाडले जाते. माणूस म्हणून तिचे स्वतंत्र अस्तित्व नाकारले जाते. व्रतवैकल्यात गुंतलेली स्त्री एकीकडे दैववादी, अंधश्रद्धाळू, आत्मविश्वास हरपलेली बनते तर पतीसापेक्ष जीवन जगणारी आणि सर्वस्वी पतीवर अवलंबून असणारी स्त्री पतीविना असहाय्य बनते. पतीने घराबाहेर काढलेल्या स्त्रीला स्वतःचे घरच नसते. मूल झाले नाही, मुलगा झाला नाही या कारणासाठी सुद्धा स्त्रीला घराबाहेर काढले जाते. प्रौढ कुमारिका, विधवा, परित्यक्ता, स्त्रियांना समाजात एकटयाने जिणे कठीण होऊन बसते. मातृत्वाची गौरवगाथा गाणारा आमचा समाज कुमारी मातांना किंवा बलात्कारामुळे मातृत्व प्राप्त झालेल्या स्त्रियांना जगणे अशक्य करतो. सुशिक्षीत, मिळवत्या स्त्रियांचीही स्थिती अशीच असते. लग्न व सफल वैवाहिक जीवन हेच त्या आपले जीवन सर्वस्व समजतात. मातृत्व प्राप्त झाले नाही तर निराश होतात. कित्येकवेळा मुलगा झाला नाही ह्याचीही खंत करतात. पतीसेवेसाठी, मुलाच्या संगोपनासाठी, डॉक्टर, इंजीनिअर होऊनही शिक्षणाचा उपयोग न करता स्वेच्छेत अगर अनिच्छेने पण प्रतिकार न करता घरी बसतात. वयानुसार मुले आईपासून वेगळी झाली, स्वतंत्रपणे वावरू लागली की स्त्रीच्या जीवनात एक भयाण पोकळी निर्माण होते. ती दुःसह होते. मग त्याचा राग मुलांवर व इतरांवर काढला जातो. तेव्हा घरकामात आणि मुलांच्या संगोपनात स्वतःचे सर्वस्व हरवून [illegible] स्त्रियांनी प्रथमपासून स्वतःचे स्वतंत्र [illegible] निर्माण करण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

नोकरी, कामधंदा करणाऱ्या स्त्रियांना घरकाम बालसंगोपन व अर्थार्जनाचे काम अशी कामाची दुहेरी

पाळी करावी लागते. लग्न, बाळंतपण, बालसंगोपन, घरकाम आणि स्त्रियांचे समाजातील कनिष्ठ स्थान त्यांच्या वैयक्तिक उन्नतीच्या आड येतात. ज्या उद्योगात स्त्रियांना बाळंतपणाची रजा द्यावी लागते, पाळणाघराची सोय करावी लागते अशा उद्योगात स्त्रियांना न घेण्याकडे कल दिसतो. कारण त्यामुळे नफा कमी होतो. विशेषतः विवाहित स्त्रियांना कामावर न घेणे, विवाह झाल्यावर कामावरून मुलींना काढून टाकणे, गरोदर स्त्रियांना कामावरून काढून टाकणे किंवा बाळंतपणाची रजा देण्याचे टाळणे हे उपाय योजले जातात. पाळणाघर सुरू करावे लागू नये म्हणून ५ पेक्षा कमी स्त्रियाच कामावर घेतल्या जातात.

स्त्रीकडे मानवाच्या पुनरुत्पादनाचे साधन, मानव जननयंत्र म्हणून पाहिले जात असल्यामुळे तिच्या शरीरालाच महत्त्व दिले जाते. तिला मन व बुद्धी, विचार व भावना आहेत याकडे दुर्लक्ष केले जाते. तिला भोगवस्तू समजले जाते. तिचे सौंदर्य, लैंगिक वासनापूर्ती करण्याची क्षमता लक्षात घेतली जाते. तिची बुद्धिमत्ता, कौशल्य यांना फारसे महत्त्व दिले जात नाही. वधूची परीक्षा सौंदर्यावरून केली जाते. सद्गुणांवरून नाही. जाहिरात, साहित्य, चित्रपट, नाटक यामधून स्त्रीचे शरीरप्रदर्शन व विकृत चित्रण केले जाते. स्त्रीकडे भोगवस्तू म्हणून पहाण्याचा समाजाचा दृष्टीकोन अधिकच पक्का होतो. त्यामुळे भांडवलशाहीमध्ये स्त्रीचे रूपांतर क्रयवस्तूत होते. जाहिरात, मॉडेल्स, हवाई सुंदरी, रिसेपशनिस्ट, विक्रेत्या, चित्रपट अभिनेत्या म्हणून सुंदर स्त्रियांची निवड केली जाते. स्त्रीच्या शरीराचे प्रदर्शन त्यायोगे मांडण्यात येते. स्त्रीवर बलात्कार करणे निसर्गतः शक्य असल्यामुळे आणि स्त्रीकडे भोगवस्तू म्हणून पाहिले जात असल्यामुळे प्रत्यक्षात स्त्रियांवर बलात्कार होताहेत. स्त्री पुरुषाची मालमत्ता समजली जात असल्यामुळे संघटित होऊन अन्यायाविरुद्ध आणि आपल्या हक्कांसाठी झगडू पाहणाऱ्या दलित–कष्टकऱ्यांच्या स्त्रियांवर बलात्कार करून त्यांचे मनोधैर्य खच्ची करण्याचा प्रयत्न केला जात आहे. जरब बसविण्याचे, दडपणुकीचे साधन म्हणून बलात्कार केले जातात. ज्यांच्यावर संरक्षणासाठी जबाबदारी आहे ते पोलिसच बलात्कार करू लागले आहेत. आज भारतातील कोणतीही स्त्री, सात महिन्यापासून सत्तर वर्षाच्या म्हतारीपर्यंत सुरक्षित नाही. तिचा बाप पती, मुलगा, समाज अगर कायदा तिला संरक्षण मिळवून द्यायला असमर्थ ठरला आहे.

## बालसंगोपन : समाजाची जबाबदारी

नऊ महिने गर्भ पोटात वाढवून आणि मुलांना जन्म देऊन मानवाचे पुनरुत्पादन करण्याची जबाबदारी निसर्गाने स्त्रीवर टाकली आहे हे सत्य नाकारता येणार नाही हे खरे आहे. परंतु एकटी स्त्री मानवाचे पुनरुत्पादन करू शकत नाही. स्त्री-पुरुष संबंधातूनच मुले जन्मजात हेही तितकेच खरे. तेव्हा मुले स्त्रीपुरुष दोघांचीही असतात. एकट्या स्त्रीवर त्यांच्या संगोपनाची जबाबदारी टाकणे न्याय्य नाही. मुलांच्या समतोलवाढीच्या दृष्टीने योग्यही नाही. आईवडील दोघांच्या बुद्धीचा, सद्गुणांचा, फायदा मुलांना मिळाला पाहिजे. त्याचप्रमाणे स्त्रिया मुलांना जन्म देऊन राष्ट्रासाठी उद्याचे नागरिक, श्रमिक, शास्त्रज्ञ, सैनिक, साहित्यिक वगैरेंची तरतूद करत असतात. तेव्हा मुलांची जबाबदारी फक्त स्त्रियांची नसून पुरुषांची व समाजाचीही आहे. वास्तविक निसर्गाने स्त्रीवर मुलांना जन्म देण्याची जबाबदारी टाकली आहे, तेव्हा पुरुषांनी आणि समाजाने त्यांच्या संगोपनाची जबाबदारी उचलून स्त्रीवरचा भार कमी करायला हवा होता. पण स्त्रीवर मुलांच्या संगोपनाची जबाबदारी टाकून समाजाने तिच्यावर अन्याय केलेला आहे. समाजाने या पुनरुत्पादनाच्या कार्यात योग्य ती भागीदारी केलीच पाहिजे. गरोदरपणी स्त्रीचे व गर्भाचे योग्य पोषण, सुकर व

सुरक्षित बाळंतपण, बाळंतपणानंतर स्त्रीची व बाळाची योग्य शुश्रूषा, कुटुंबनियोजनाची सोय वगैरे गोष्टींकडे लक्ष पुरवले पाहिजे. स्त्रिया समाजासाठी एक महत्वाचे कार्य करत असतात. बाळंतपणाची रजा देतो तेव्हा आपण स्त्रीवर उपकार करतो अशा थाटात मालक, समाजातील लोक वागत असतात. परंतु समाजासाठीच स्त्री पुनरुत्पादन करत असल्याने बाळंतपणाची रजा हा स्त्रीचा हक्क तर समाजाचे कर्तव्य आहे. बाळंतपण किंवा बाळंतपणाची रजा स्त्रीच्या व्यावसायिक उन्नतीच्या आड आणता उपयोगी नाही. मुलांना ठेवण्यासाठी विशेषतः अंगावर पिणाऱ्या मुलांना ठेवण्यासाठी कामाच्या ठिकाणी सुसज्य पाळणाघरे उघडली पाहिजेत. स्त्रीला घरकाम, बालसंगोपन आणि अर्थार्जन असे काम करावे लागत असल्याने तिच्या आरोग्यावर व व्यवसायातील कार्यक्षमतेदर परिणाम होतो. तेव्हा घरकाम, बालसंगोपनात पुरुषांचा सहभाग आणि पाळणाघर, स्वस्त धुलाई केंद्रे, स्वस्त जेवणगृहे, बालवाड्या, संगोपनगृहे वगैरेची सोय करून घरकामाचे जास्तीत जास्त सामाजिकीकरण करून स्त्रीवरील घरकामाचा बोजा जास्तीत जास्त हलका केला पाहिजे.

अर्थात पुनरुत्पादनाच्या व बालसंगोपनाच्या कार्यात समाजाने भागीदारी केली तरी प्रत्येक स्त्रीला किती मुले व्हावी, केव्हा व्हावी हे ठरविण्याचा अधिकार असला पाहिजे. समाजाला नव्हे. कारण शेवटी स्त्रीलाच गर्भापोषणा करून मुलांना जन्म द्यावा लागत असल्याने तिच्या आरोग्यावर व तिच्या वैयक्तिक उन्नतीवर त्याचा परिणाम काही प्रमाणात का होईना होतोच

## संघटित प्रयत्न हवे

अर्थात् स्त्रीचे हे व इतर सर्व हक्क मान्य व्हायचे आणि प्रत्यक्षात उतरायचे तर स्त्रीला त्यासाठी झगडा द्यावा लागणार आहे. त्यासाठी स्त्रियांच्या बळकट संघटना बांधायला पाहिजेत. समाजाचा स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलण्यासाठी व्यापक प्रमाणावर सामाजिक प्रबोधन होणे आवश्यक आहे. स्त्री ही कोणाचीही मालमत्ता नाही तर ती स्वतंत्र मानवी व्यक्ती आहे. स्वत:च्या इच्छेप्रमाणे स्वत:चा विकास घडवून आणण्याचे तिला पूर्ण स्वातंत्र्य आहे. मातृत्वही त्याच्या आड येता उपयोगी नाही हे सर्वतोपरी समाजाला पटवून दिले पाहिजे.

आज स्त्रीमुक्तीचा लढा प्रामुख्याने शहरी, मध्यमवर्गीय स्त्रियांपुरताच मर्यादित आहे. भारतातील बहुसंख्य स्त्रिया खेड्यापाड्यातून राहतात, आणि दलित आदिवासी कष्टकरी वर्गात मोडतात. या स्त्रियांना सामावून घेण्याच्या दृष्टीने स्त्रीमुक्तीची चळवळ खेड्यापाड्यात पसरली पाहिजे दलित, आदिवासी, शेतमजूर, हमाल, मोलकरणी, विडी तंबाखू उद्योगातील, रोजगार हमीच्या कामावरील स्त्रिया, परिचारिका, शिक्षिका, ग्रामसेविका वगैरे स्त्रियांनाही स्त्रीच्या सर्व हक्कांची जाणीव करून देऊन त्या प्राप्त करून घेण्यासाठी संघटित लढ्याला तयार करावे लागेल. आज ठिकठिकाणी अशा स्त्रियांच्या संघटना उभ्या राहू पहात आहेत. आपल्या प्रश्नावर त्या झगडत आहेत. या निरनिराळ्या गटातील स्त्रियांवरील अन्यायाचा तपशील वेगवेगळा असला तरी त्यांच्या दु:खाची जात, अन्यायाचे मूळ एकच आहे. समाजातील स्त्रीचे दुय्यम स्थान, स्त्रीकडे पुरुषाची मालमत्ता, भोगवस्तू म्हणून पाहण्याचा समाजाचा दृष्टीकोन त्याच्या मुळाशी आहे. तेव्हा सर्व स्त्रियांनी एकजुटीने स्त्रियांच्या प्रश्नावर लढावे लागेल. एकमेकांना साथ करावी लागेल. दलित-आदिवासी-कष्टकरी स्त्रियांचे प्रश्न केवळ पुरुषप्रधान समाजव्यवस्थेशी निगडित नसून जातीव्यवस्थेशी व भांडवलशाहीतील आर्थिक विषमतेशी निगडीत आहेत. हे लक्षात घेता स्त्रीमुक्तीचा प्रश्न हा शेवटी सर्वांगीण सामाजिक परिवर्तनाच्या लढ्याचा भाग आहे ह्याचे विस्मरण होता कामा नये. आणि म्हणून पुरोगामी विचाराच्या पुरुषांचे व संघटनांचेही सहकार्य त्यासाठी आवश्य घ्यावे लागेल. स्त्रियांचे प्रश्न हे फक्त स्त्रियांचे नसून समाजाचेही आहेत. अर्धी अधिक लोकसंख्या दडपलेली, पिळलेली असता सर्वांगीण सामाजिक परिवर्तनाचा लढा यशस्वी होणे शक्य नाही. स्त्रीमुक्ती शिवाय सामाजिक मुक्ती अपूर्ण आहे हेही सत्य लक्षात घ्यावे लागते.